MHNS130009742015

नियमित दिवाणी दावा क्र.१०५/२०१५
नारायण सोनवणे .. वि संजय शेलार

## निशाणी क्र.७० वर आदेश

प्रस्तुत दावा निरंतर मनाई हुकूमाकरीता असुन तो सुमारे ९ वर्षे जुना म्हणजेच सन २०१५ सालचा आहे. सदर दाव्यातील वादी हे जेष्ठ नागरीक आहेत.

२. प्रस्तुतचा अर्ज हा प्रतिवादी यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द व्हावा यासाठी केलेला आहे. प्रस्तूत अर्जावर वादीचे म्हणणे मागविले. त्यावर वादीने दिलेले म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा सविस्तर युक्तीवाद ऐकला.

३. प्रतिवादी यांच्या वकीलांनी असा युक्तीवाद केला की,दि.२२/११/२०२४ रोजी प्रथम सत्रात प्रतिवादी विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत झाला. प्रतिवादीचा दावा लांबविण्याचा कोणताही उद्देश नव्हता व नाही. सदरचा उलटतपास नाहीचा आदेश रद्द झाल्यास दाव्याचा गुणवत्तेवर निकाल लागण्यास मदत होईल. प्रतिवादी उलटतपासाकरीता तयार आहे. त्यामुळे प्रतिवादी विरुध्द झालेला 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द करण्यात यावा.

४. वादीच्या वकीलांनी प्रतिवादींच्या अर्जावर आक्षेप घेतला की, प्रतिवादीचा अर्ज खरा योग्य व कायदेशीर नाही. प्रतिवादींना यापुर्वी न्यायालयाने संधी देवुन देखील त्यानंतर प्रतिवादी न्यायालयात हेतुपुरस्पर हजर न राहता केवळ विनाकारण वादीस त्रास देण्याचा प्रयत्न करीत आहे. वादी हे वयोवृध्द असुन वादीचा पुरावा संपल्यानंतर केवळ दाव्याचे कामकाज लांबविण्यासाठी व वेळकाढुपणा करण्यासाठी खोटा अर्ज केला आहे. तरी प्रतिवादीचा अर्ज खर्चासह रद्द करण्याची विनंती वादीने केलेली आहे.

५. प्रस्तुत दाव्याच्या रोजनाम्याचे अवलोकन करता असे दिसुन येते की, दि.१८/११/२०२४ रोजी प्रतिवादी व विधीज्ञ गैरहजर होते. तद्नंतर दि. २२/११/२०२४ रोजी नि. क्र. ४२ लगत सविस्तर निरीक्षण नोंदवुन उलटतपास नाही असा प्रतिवादीविरुध्द आदेश करण्यात आला होता. वादी हे जेष्ठ नागरीक असल्याने आणि त्यादिवशी ते सकाळी ११.०० वाजेपासुन दुपारी ०२.०० वाजेपर्यंत न्यायालयात हजर असल्याने, वारंवार पुकारा करुनही प्रतिवादी गैरहजर असल्याने, वारंवार पुकारा करुनही प्रतिवादीकडुन तहकुबीचा अर्ज नसल्याने, प्रतिवादीला सदर उलटतपासाची संपुर्ण माहिती असल्याचे ज्ञात असुनही प्रतिवादी त्यादिवशी उलटतपास घेण्यास अपयशी ठरल्याने नि. क्र. ४२ लगत प्रतिवादी विरुध्द उलटतपास नाही असा आदेश पारीत करण्यात आला होता. त्यामुळे प्रतिवादीने कथन केल्याप्रमाणे प्रतिवादीचे विधीज्ञ न्यायालयात हजर होते, प्रथमसत्रात प्रतिवादीविरुधद उलटतपास नाही असा आदेश पारीत झाला या कथनात तथ्य नाही कारण दि. २२/११/२०२४ चा रोजनामा सुस्पष्ट व पुरेसा आहे.

६. दोन्ही बाजूंचा युक्तीवाद लक्षात घेता, प्रत्येक अर्जात गुणदोषावर चौकशी होणे न्यायाचे दृष्टीने आवश्यक असते. अशा चौकशीसाठी पक्षकाराचे म्हणणे दाखल होणे व त्याची योग्य बाजू मांडणे हे न्यायाच्या दृष्टीने आवश्यक असते. त्यामुळे न्यायाच्या दृष्टीने नैसर्गिक न्यायतत्वाच्या आधारे प्रतिवादी यांना त्यांची बाजु मांडण्याची संधी मिळणे न्यायोचित आहे. परंतु वादीचे आणि दाव्याचे वय लक्षात घेता वादीची झालेली गैरसोय प्रतिवादीस खर्च/ कॉस्ट देण्याच्या आदेशाने भरुन निघणे न्यायाच्या हिताकरीता आवश्यक आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश,

## **आदेश**

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी वादीस पुढील तारखेस अगर तत्पुर्वी रु.१०००/– देण्याच्या अटीवर 'उलटतपास नाहीचा आदेश' रद्द करण्यात येतो.

(पी.डी. कोळेकर)

दिनांकः– ०७/१२/२०२४

दिवाणी न्यायाधिश क.स्तर,
पिंपळगाव – बसवंत